# बृहन्मुंबई महानगरपालिका

परिपत्रक क्र.MGC/F/ 4967 दि.०२.०८.२०२१

विषय : 'ब्रेक-द-चेन' मिशन अंतर्गत कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव कमी करण्यासाठी निर्बंध लादणेबाबत.

संदर्भ : १) साथरोग प्रतिबंधक अधिनियम १८९७
२) आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५
३) राज्य शासनाचे क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.०४.०६.२०२१ चे आदेश
४) मुंबई महानगरपालिकेचे क्र.MGC/F/४६२९ दि.०५.०६.२०२१ चे आदेश.
५) मुंबई महानगरपालिकेचे क्र.MGC/F/४६६३ दि.१८.०६.२०२१ चे आदेश.
६) राज्य शासनाचे क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.२५.०६.२०२१ चे आदेश.
७) राज्य शासनाचे क्र.Corona 2021/C.R. 366/Arogya-5 दि.२.०८.२०२१ चे आदेश.

''ब्रेक-द-चेन'' अंतर्गत राज्य शासनाने आदेश क्र.DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि.०४.०६.२०२१ अन्वये आदेश पारित केलेले आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत मागील २ आठवडयातील कोव्हिड-१९ सकारात्मक सरासरी दर (Positivity Rate) १.७६% इतका असून, ऑक्सिजन बेड व्याप्तीचा सरासरी दर (Oxygen bed Occupancy)१८.९७% इतका आहे.

तसेच राज्य शासनाने दि.०२.०८.२०२१ रोजी आदेश क्र.Corona 2021/C.R. 366/Arogya-5 पारीत केलेले आहेत आणि त्या अन्वये मुंबई व मुंबई उपनगर जिल्ह्यांमधील निर्बंध शिथील करण्यासंदर्भात जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणास प्राधिकृत केले आहे.

यापूर्वी कोव्हीड-१९ प्रतिबंधात्मक उपाययोजनांचे पालन करण्यात अडचणी येण्याची शक्यता लक्षात घेऊन, कोव्हीड प्रसाराला आळा घालण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत लेव्हल-३ चे निर्बंधांबाबत दि.०५.०६.२०२१ रोजी क्र.MGC/F/४६२९ आणि १८.०६.२०२१ रोजी क्र.MGC/F/४६६३ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत. (सोबत जोडलेले).

2/8-21

दि.०२.०८.२०२१ च्या शासन निर्णयातील उपरोक्त नमूद संदर्भानुसार मुंबई महापालिका क्षेत्रासाठी यापूर्वी पारीत केलेल्या दि.०५.०६.२०२१ रोजीच्या आदेशातील निर्बंध पुढीलप्रमाणे अंशत: शिथील करण्यात येत आहेत.

१) सर्व दुकाने व आस्थापना आठवडयाचे सर्व दिवस रात्री १० वाजेपर्यंत चालू ठेवण्यास परवानगी असेल. परंतु, मेडिकल व केमिस्ट दुकाने आठवडयातील सर्व दिवस २४ तास उघडी ठेवण्यास परवानगी असेल.

२) सर्व रेस्टॉरंट/हॉटेल्स आठवडयाचे सर्व दिवस दुपारी ४ वाजेपर्यंत चालू ठेवण्यास परवानगी असेल.

३) जलतरण तलाव आणि निकट संपर्क येऊ शकतो असे क्रीडा प्रकार वगळून अन्य इनडोअर व आऊटडोअर खेळांस आठवडयाचे सर्व दिवस नियमित वेळेनुसार परवानगी असेल.

४) चित्रीकरण नियमीत वेळेनुसार करण्यास परवानगी असेल.

दि.०५.०६.२०२१ रोजी क्र.MGC/F/४६२९ आणि १८.०६.२०२१ रोजी क्र.MGC/F/४६६३ अन्वये आदेश निर्गमित करण्यात आलेल्या आदेशातील इतर तरतुदी पुढील आदेशापर्यंत जशाच्या तशा लागू राहतील.

शासनाने वेळोवेळी जाहीर केल्याप्रमाणे आणि दि.२५.०६.२०२१ रोजीच्या आदेशात नमूद केल्यानुसार सोशल डिस्टंसिंग, मास्कचा वापर व इतर उपाययोजना अनिवार्य राहतील.

उक्त आदेशान्वये सर्व संबंधितांनी अंमलबजावणी करावी. सदरहू आदेशाची अंमलबजावणी करण्यास कोणत्याही व्यक्तीने टाळाटाळ केल्यास अथवा विरोध दर्शविल्यास संबंधितांचे विरुद्ध यथास्थिती आपत्ती व्यवस्थापन अधिनियम, २००५ मधील कलम ५१ ते ६० व भारतीय दंड संहिता, १८६० मधील कलम १८८ आणि लागू असणाऱ्या इतर कायदेशीर तरतुदी नुसार कारवाई करण्यात येईल.

निम्नस्वाक्षरीकार स्वेच्छेने कधीही सदरचे आदेश सुधारीत किंवा रद्द करु शकतील.

वरील आदेश 3-8- २०२१ पासून पुढील आदेशांपर्यंत जसेच्या तसे लागू राहतील.

2/8-21.

आय. एस. चहल
महानगरपालिका आयुक्त
बृहन्मुंबई महानगरपालिका